## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. २२ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ **मंगळवार दि. २३ डिसेंबर,** २०२५ रोजी **सकाळी १०.०० वाजता** विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न होत असून, या समारंभाची तयारी पूर्ण झालेली आहे. कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांनी तयारीचा आढावा घेतला. यावेळी , प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांची उपस्थिती होती.

या दीक्षांत समारंभासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी राहणार असून राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळूरुचे संचालक प्रा.गणेशन कन्नबीरन यांचे दीक्षांत भाषण होणार आहे.

या समारंभात, एकूण २९ हजार ९७ विद्यार्थ्यांनी समारंभात नोंदणी केली असून. यामध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे १२,२५९ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ४,५९९ स्नातक, मानवविज्ञान विद्याशाखेचे ६,४१९ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे २,२६० स्नातकांचा समावेश आहे. यात स्वायत्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे २८७, मुळजी जेठा महाविद्यालयाचे १२७१, प्रताप महाविद्यालयाचे ८५२, जी.एच.रायसोनी इन्स्टीट्युट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंटचे ९६३, व आर. सी. पटेल इन्स्टिटयुट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूरचे १८७ अशा एकूण ३,५६० विद्यार्थ्यांना पदवी बहाल केली जाणार आहे. गुणवत्ता यादीतील १२० विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या मध्ये ८८ मुले व ३२ मुलींचा समावेश आहे. या समारंभात १९५ पीएच.डी. धारक विद्यार्थी देखील पदवी घेणार आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाविषयी असलेली आत्मियता लक्षात घेवून व विद्यापीठाचे ब्रँडीग व्हावे या हेतूने या वर्षी सुध्दा पदवी प्रमाणपत्रा सोबत **"माझं विद्यापीठ, माझं ज्ञानवैभव"** असा मजकूर असलेले स्टिकर स्नातकांना दिले जाणार आहे. ते स्टिकर विद्यार्थ्यांनी आपल्या घरात प्रथमदर्शनी भागात लावणे अपेक्षित आहे.

विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर स्नातकांसाठी सुचना व डिग्री कोड देण्यात आला आहे. स्नातकांनी पदवी ग्रहण करण्यासाठी सभारंभाच्या दिवशी प्राप्त झालेली डिग्री कोड, ओळखदर्शक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. स्नातकांना पदवी प्रमाणपत्र मिळणे सोयीचे व्हावे, याकरीता पदवी प्रमाणपत्राचे व उत्तरीय वाटप अभ्यासक्रमनिहाय खालील प्रमाणे प्रशासकीय इमारतीत काऊंटरवर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. **दालन क्र.** १२९ (परीक्षा भवन तळमजला) **खिडकी क्र.** १ पीएच्.डी. सर्व विषय, **दालन क्र.** १०७ **(सामान्य प्रशासन, आवक-जावक विभाग):- खिडकी क्र.**०२ वर बी.ए. व एम.ए. (सर्व विषय), बी.एसडब्ल्यू., एम.एस.डब्लू., डी.पी.ए., बी.एफ.ए., एम.एफ.ए., **दालन क्रमांक** १११ (सहायक कुलसचिव प्रशासन यांचे दालन) बी.कॉम., एम.कॉम., आणि सर्व मॅनेजमेंट कोर्सेस, **दालन क्रमांक** १११ (सहायक कुलसचिव प्रशासन यांचे दालन) बी.एड.आणि एम.एड. एम.ए.-एज्युकेशन, **दालन क्रमांक ११४ (प्रवेश व पात्रता विभाग)** बी. एस्सी. – सर्व विषय, **दालन क्रमाक ११४** (प्रवेश व पात्रता विभाग) एम.एस्सी.-सर्व विषय, (विद्यापीठ प्रशाळेतील सर्व विद्यार्थी), लॉ. सर्व विषय, **दालन क्रमांक ११४** (प्रवेश पात्रता विभाग) बी.ई.- सर्व विषय, बी.टेक. – सर्व विषय, एम. टेक.-सर्व विषय, बी.व्होक. – सर्व सर्व विषय, बी. फार्मसी, एम.फार्मसी.

दीक्षांत समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. जे विद्यार्थी या समारंभास उपस्थित राहणार नाहीत अशा गैरहजर विद्यार्थ्यांना २६डिसेंबर, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत विद्यापीठाच्या पदवी प्रदान विभागातून कार्यालयीन वेळेत ओळखदर्शक पुरावा दाखवून पदवी प्रमाणपत्र घेता येईल. जे विद्यार्थी एक महिन्यापर्यंत विद्यापीठात येऊन त्यांचे प्रमाणपत्र घेऊन जाणार नाहीत त्यांचे प्रमाणपत्र फेब्रुवारी, २०२६ पासून टपालाव्दारे (स्पीड पोस्ट) टप्प्या-टप्प्याने पाठविण्यात येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता पूर्ण झालेली नाही अशा विद्यार्थ्यांना त्यांची पात्रता पूर्ण केल्याचे पत्र सादर केल्यानंतरच प्रमाणपत्र मिळू शकेल. या विद्यार्थ्यांची यादी ही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. समारंभाबाबतचा सर्व तपशील विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर देण्यात आला आहे. समारंभास्थळी सकाळी ठिक ८.३० वाजता विद्यार्थी व निमंत्रितांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

समारंभात सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांनी पांढऱ्या रंगाचा शर्ट, पांढऱ्या रंगाची पँन्ट किंवा पांढऱ्या रंगाचा नेहरु शर्ट आणि पांढऱ्या रंगाचे पायजमा तर विद्यार्थिनींसाठी लाल किनार असलेली पांढरी साडी, लाल रंगाचे ब्लाऊज किंवा लाल रंगाचा कुर्ता (कमीज) व पांढऱ्या

रंगाची सलवार अशा पोशाखात उपस्थित रहावे. दीक्षांत समारंभासाठी उपस्थित राहणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना विशिष्ट पोशाखाची सक्ती नाही मात्र भारतीय संस्कृती व परंपरेचा सन्मान राखत नेटका पोशाख करुन उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

**तसेच सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण (live) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर होणार आहे. सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांनाही बघता यावे यासाठी महाविद्यालयांनी व्यवस्था करावयाची आहे. या बाबत सर्व महाविद्यालयांना सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभास येण्याकरीता शहर बस सेवेची (एस.टी. बस) व्यवस्था असणार आहे आणि विद्यापीठाच्या प्रवेश द्वारा पासून विद्यापीठ प्रशासकीय इमारतीपर्यंत अंतर्गत वाहतुकीसाठी ई-रिक्षा सेवेची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.** अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील यांनी दिली.

***बातमी नं.२***

जळगाव प्रतिनीधी (दि. २२) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील निवासी कर्मचारी यांच्यासाठी व त्यांच्या कुटुंबासाठी त्याचबरोबर वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी व सर्व नागरिकांसाठी २१ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक ध्यान दिवसाचे औचित्य साधून ध्यान कार्यशाळेचे आयोजन २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता योग हॉल, योगशास्त्र विभाग, कबचौ उमवि जळगाव येथे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेसाठी श्री. प्रदीप पाटील सेवा निवृत्त फॉरेस्ट ऑफिसर; श्री. विकास चौधरी उद्योजक, जळगाव; अॅड. सुजल भोसले जिल्हा न्यायालय, जळगाव आणि इंजि. राजेश पाटील विभाग प्रमुख, योगशास्त्र विभाग, कबचौ उमवि जळगाव यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. ध्यान कार्यशाळेत **पूज्य विश्व विपश्यनाचार्य सत्यनारायण गोयकांजींच्या ऑडीओ व व्हिडिओ द्वारे आनापन सती या अनमोल विद्येचा सराव व विपश्यना साधना परिचय** घेण्यात आला. त्यानंतर **विपश्यना ध्यान** कसे केले जाते, ध्यान म्हणजे purification of mind होय. यात फक्त आपल्या श्वासावर आपल्याला लक्ष देणे आवश्यक आहे. शील समाधी आणि प्रज्ञा यांचा अभ्यास यासाठी आवश्यक आहे असे प्रतिपादन श्री प्रदीप पाटील यांनी केले. त्यानंतर इंजि. राजेश पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विपश्यनेचे आजच्या काळातील महत्व वर्णन करून आपल्या श्वासावर आपले लक्ष एकाग्र करून आपण ध्यानाचा अभ्यास करू शकतो. मनावर ताबा मिळवू शकतो. म्हणूनच योगाला मनाचे शास्त्र म्हटले आहे असे उपस्थितांना मार्गदर्शन केले. ऑडीओ व व्हिडिओ द्वारे आनापन सती या अनमोल विद्येचा सराव करून घेतल्यामुळे विपश्यना ध्यानाची अनुभूती विद्यार्थ्यांना मिळाली. सुरुवातीला डॉ. लीना चौधरी (सहा. प्राध्यापक योग थेरेपी) यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. प्रास्ताविकात त्यांनी योगशास्त्र विभागात चालणाऱ्या विविध अभ्यासक्रम तसेच योगशास्त्र विभागास DST या संस्थेकडून मिळालेल्या रिसर्च अनुदानाबद्दल उपस्थितांना माहिती दिली. ध्यान कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. गीतांजली भंगाळे यांनी तर आभार प्रा. लिंता चौधरी यांनी मानले. सदर कार्यशाळेसाठी योगशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. एकनाथ नन्नवरे, माधवी तायडे, तुषार सोनवणे, रत्नाकर सोनार, ललित यांचे अनमोल सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २२ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता